ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख २ डिसेंबर, १९५९ | अंक ४४

## विविध माहिती

**परदेशीय प्रवाशांना सवलत**—भारतांत येणाऱ्या परदेशीय हौशी प्रवाशांना ते खुष्कीच्या मार्गानें येणार असतील तर मोटारी, जीप गाड्या व स्टेशन वॅगन्स आयात करण्यास परवानगी देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. त्यांच्या प्रवाससंबंधींच्या कागदपत्रांत जितकी मुदत असेल तेवढ्याच मुदतींत त्यांना ह्या मोटारी वापरतां येतील. नंतर त्या परत निर्यात कराव्या लागतील.

**फ्रान्सच्या अणुबॉंबचा स्फोट**—फ्रान्सनें तयार केलेल्या पहिल्या अणुबॉंबच्या स्फोटाची सहारा वाळवंटांतील जागा निश्चित करण्यांत आली आहे. हा स्फोट अंतराळांतच करण्यांत येणार आहे. अणुस्फोट जमिनीखालीं करण्यांत आले तर त्यामुळें बंदरें बांधण्याच्या अगर तेलखाणी खणण्याच्या कामीं उपयुक्त माहिती मिळूं शकेल, असें फ्रेंच अणुशास्त्रज्ञांचें मत आहे.

**अणुशक्ति-केंद्राची जागा**—मद्रास विधिमंडळाचे अध्यक्ष डॉ. राव ह्यांनीं अशी सूचना केली आहे कीं, अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें भारतामधील केंद्र दक्षिण हिंदुस्थानांत उभारण्यांत यावें. ह्या भागापासून कोळशाच्या खाणी फार लांब आहेत आणि अधिक जलविद्युत् निर्माण करण्याची आतां शक्यता नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे.

**मध्यप्रदेशांतून तांदुळाची आयात**—मुंबई सरकार मध्यप्रदेशांतून १९,००० टन तांदूळ लवकरच आयात करणार आहे. मध्यप्रदेश सरकारनें हुकूम काढून तांदुळाची किमान किंमत मणामागें १९ रु. ठरविली आहे. मध्यप्रदेशांतील छत्तीसगढ भागांतून हा तांदूळ आणण्यांत येणार आहे. मुंबई राज्यांत तांदुळाची विशेष टंचाई आहे.

**सौराष्ट्रांतील गिरण्या संकटांत**—गुजरात व सौराष्ट्रांतील कापडाच्या पांच गिरण्या पैशाच्या अडचणींत सांपडल्या आहेत. अडचणी निवारण करण्याचे प्रयत्न वेळींच झाले नाहींत तर ह्या सर्व गिरण्या बंद पडण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. तसें झाल्यास सुमारें ३,००० कामगारांना रोजगाराला मुकावें लागेल.

**धान्याची जागतिक बँक**—भारताचे अन्नमंत्री श्री. स. का. पाटील जागतिक अन्न व शेतकी परिषदेसाठी परदेशी गेले होते. परिषदेला गेलेल्या हिंदी प्रतिनिधींनीं धान्याची जागतिक बँक स्थापन करण्याची सूचना केली होती. ह्या सूचनेला बहुतेक सर्व सभासद देशांनीं पाठिंबा दिला, अशी माहिती श्री. पाटील ह्यांनीं सांगितली.

**कैरोंत भारतीय मालाचें प्रदर्शन**—कैरो येथें भारतांत तयार होणाऱ्या एंजिनिअरिंगच्या मालाचें एक प्रदर्शन उघडण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत हवामान सुखद राखण्याचीं यंत्रसामुग्री, मोटारी, सायकली, एंजिन्स, शिवणाचीं यंत्रें, इत्यादि माल ठेवण्यांत आला आहे. हिंदी मालाची निर्यात वाढविण्यासाठी प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे.

**सौराष्ट्रांत कोळशाचा शोध**—नागपूर येथील सरकारी भूगर्भ संशोधन संस्थेनें सौराष्ट्रांत कोळशाचा शोध करण्यासाठी पांच तज्ज्ञांची एक तुकडी पाठविण्याचें ठरविलें आहे. त्यांच्याबरोबर आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्रीहि पाठविण्यांत येईल. सौराष्ट्रांत कांहीं भागांत विपुल प्रमाणांत कोळसा सांपडण्याची शक्यता आहे, असें म्हणतात.

**सुरत शहराचा बचाव**—तापी नदीला गेल्या पावसाळ्यांत जो पूर आला होता, त्यामुळें नदीकांठीं असलेली जुनी बचावाची भिंत कांहीं ठिकाणीं ढासळली होती. ह्या भिंतीची दुरुस्ती करण्यासाठी जो खर्च येईल त्यांपैकीं दोन-तृतिआंश खर्च मुंबई सरकार देणार आहे. बाकीचा खर्च सुरत म्युनिसिपालिटीनें सोसावयाचा आहे.

**औद्योगिक खटल्यांचे निकाल**—औद्योगिक तंट्यांचे निकाल लवकर लागण्याच्या दृष्टीनें औद्योगिक कलह कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल लोकसभेंत सरकारतर्फे लवकरच मांडण्यांत येणार आहे. औद्योगिक कोर्टांनें दिलेले निवाडे चटकन् अमलांत आणण्याची व ते अमलांत न आणणाऱ्या कारखानदारांना शिक्षा देण्याची तरतूदहि बिलांत करण्यांत येणार आहे.

**बंगलोरमधील पहाणी**—बंगलोर शहराच्या गलिच्छ वस्त्यांतून राहणाऱ्या कुटुंबांच्या उत्पन्नाची आंकडे-शास्त्रीय पहाणी करण्यांत आली. पहाणींत असें आढळून आलें कीं, ह्या कुटुंबाचें सरासरी मासिक उत्पन्न ७५ रुपये आहे. बंगलोर शहरांतील घाणेरड्या वस्त्यांतील १३,००० झोपड्यांतून ६९,००० हजार लोक राहतात.

**दुसऱ्या महायुद्धांतील लष्करी चूक**—दुसऱ्या महायुद्धांतील ब्रिटनचे सेनापति फील्ड मार्शल मॉंटगोमरी न्यूयॉर्क येथें बोलतांना म्हणाले कीं, पाश्चिमात्य राष्ट्रांनीं इटलींत प्रवेश केल्यावर तेथून पुढें ऑस्ट्रिआंत घुसण्यास पाहिजे होतें. लष्करी डावपेंचाच्या दृष्टीनें ही मोठी चूक झाली व त्यांमुळें रशिआचें सैन्य ऑस्ट्रिआंत शिरूं शकलें.

## खाऱ्या सरोवरापासून मीठ तयार करणार

राजस्थान सरकारनें दिद्वाना येथें खाऱ्या पाण्यापासून मीठ तयार करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. राजस्थानांत खाऱ्या पाण्याचीं सरोवरें दोन ठिकाणीं असून त्यांपैकीं दिद्वाना हें एक ठिकाण आहे. ह्या ठिकाणीं असलेल्या पाण्यापासून मीठ तयार करण्याचा कारखाना काढण्याची योजना भारताच्या नियोजन समितीनें मंजूर केलेली आहे. त्याप्रमाणें राज्यसरकारनें एका जर्मन कारखान्याकडे जरूर ती यंत्रसामग्री पुरविण्यासाठी मागणी नोंदविली आहे. दररोज सुमारें २० टन मीठ तयार होईल इतक्या उत्पादनशक्तीची यंत्रसामुग्री मागविण्यांत आली आहे. भारतामधील अशा प्रकारचा कारखाना हा पहिलाच होईल. कारखान्याचा विस्तार करण्याची सोय मुद्दाम ठेवण्यांत येणार आहे. विस्तार करण्यांत आल्यास कारखान्याची उत्पादनक्षमता दररोज सुमारें १०० टनांपर्यंत वाढेल. मात्र, उत्पादन इतकें वाढविण्यासाठीं जरूर तितकें क्षारमिश्रित पाणी सरोवरापासून मिळालें पाहिजे. कारखान्याच्या उभारणीसाठीं एकूण सुमारें १५ लाख रुपये भांडवल लागेल. त्यांपैकीं १० लाख रुपये आयात कराव्या लागणाऱ्या यंत्रसाहित्यासाठीं खर्च होतील. यंत्रसामुग्री आयात करण्यासाठीं लागणारा परवाना देण्यांत आला असून एका वर्षाच्या अवधींत कारखाना प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल. कारखान्याची यंत्रसामुग्री अशा रीतीनें बनविण्यांत आली आहे कीं जरूर त्या गोड्या पाण्याची निर्मिति आपोआपच व्हावी. दिद्वाना येथील खाऱ्या पाण्यापासून तयार झालेलें मीठ रासायनिक उद्योगधंद्यांना फारच उपयुक्त ठरणार आहे. कारण रासायनिक धंद्यांना नको असणारे फारसे क्षार पाण्यांत नाहींत.

## भारतांतील अशुद्ध लोखंडाचें उत्पादन

भारतांत सप्टेंबर १९५९ मध्यें ६,१७,००० मेट्रिक टन अशुद्ध लोखंडाचें उत्पादन झालें असावें, असें इंडिअन ब्यूरो ऑफ माइन्स या विभागाच्या आंकडेवारीवरून दिसून येतें. सन १९५९ च्या सुरुवातीपासून सप्टेंबरअखेर भारतांत एकूण ५६,३५,००० मेट्रिक टन अशुद्ध लोखंड तयार झालें. १९५८ मधील याच काळांत झालेल्या उत्पादनापेक्षां हें उत्पादन २५ टक्क्यांनीं अधिक आहे. सप्टेंबर, १९५९ मध्यें लोखंड आणि पोलाद कारखान्यांकडे आणि निर्यात बाजारपेठांकडे अनुक्रमें ४,४३,००० मेट्रिक टन व १,५३,००० मेट्रिक टन अशुद्ध लोखंड रवाना करण्यांत आलें.

## मॅनेजिंग एजंटांची फेरनेमणूक

आपल्या मॅनेजिंग एजंटांची फेरनेमणूक करण्यासाठी भारत सरकारची मान्यता मिळवूं इच्छिणाऱ्या कंपन्यांनीं २९ फेब्रुवारी १९६० पूर्वी मध्यवर्ती व्यापार व उद्योग खात्यांतील कंपनी कायदा कारभार यंत्रणेकडे त्यांकरतां अर्ज सादर करावेत, असें भारत सरकारनें जाहीर केलें आहे. तसेंच कंपनीज ( सेंट्रल गव्हर्मेंट ) जनरल रुल्स — ॲण्ड फॉर्म्स यांत अलिकडेच केलेल्या दुरुस्तीकडेहि सरकार कंपन्यांचें लक्ष वेधूं इच्छितें. या कंपन्यांनीं दुरुस्त पद्धतीनुसार अर्जाच्या सात प्रती, कागदपत्रांच्या तितक्याच प्रती, वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या नोटिशीच्या दोन प्रमाणित प्रती, कंपनी कायदा कारभार यंत्रणेकडे पाठवाव्यात. तसेंच मॅनेजिंग एजंटांच्या नेमणुकीबाबत शेअरहोल्डरांनीं संमत केलेल्या ठरावाच्या सात प्रमाणित प्रतीहि पाठवाव्यात.

## दि बेलापूर कं. लि.

दि बेलापूर कं. लि. ला ३० सप्टेंबर, १९५९ अखेर संपलेल्या वर्षी ३½ लक्ष रु. घसारा काढून व १२¼ लक्ष रु. करासाठी राखून ठेवून २७,४८,५५७ रु. निव्वळ नफा झाला. त्यांत शिल्लकी नफा मिळवल्यावर ३०,३६,७७२ रु. नफावांटणीस येतात. प्रत्येकीं ५० रु. च्या भागास २१ रु. डिव्हिडंड देण्यांत येईल, त्याला २९,६०,८५३ रु. लागतील. कंपनीच्या इस्टेटीवरील उपलब्ध ऊस १६% कमी झाला, बाहेरचा उस मिळाला नाहीं, त्यामुळें साखरेचें उत्पादन कमी झालें. कंपनीनें सरकारी योजनेप्रमाणें ११३ टन साखर निर्गत केली.

कंपनीनें अहवालाचे वर्षी १ कोटी, ६८ लक्ष रुपयांची साखरविक्री केली. उसासाठी ४४ लक्ष रु., एक्साइज ड्यूटी व शुगर केन सेस ६२ लक्ष रु., घसारा ३½ लक्ष रु., कराची तरतुद १२¼ लक्ष रु., मॅनेजिंग एजंटाचा मुशाहिरा, ४½ लक्ष रु. असें खर्चाचे प्रमुख आंकडे आहेत. कंपनीचें वसूल भांडवल ७०½ लक्ष रुपये असून गंगाजळी १ कोटी, ३८ लक्ष रु. ची आहे. कंपनीनें २४½ लक्ष रु. सरकारी रोख्यांत गुंतवले आहेत व तिचे ८५ लक्ष रु. रोख व बँकांत शिल्लक आहेत.

## विमानाचीं इंजिनें बनविण्यांत रोल्सरॉईस आघाडीवर

सोव्हिएट गटांतील राष्ट्रें वगळून अन्य देशांतील एकूण १४५४ जेट किंवा टर्बो-प्रॉप विमानें वहातुकींत आहेत. यांपैकी ८१७ किंवा ५६ टक्के विमानांचीं एंजिनें एकट्या रोल्सरॉईस कंपनीनें तयार केलेलीं आहेत. याचा अर्थ, ही एकटी कंपनी तिच्या सर्व स्पर्धकांवर मात करीत आहे. सध्यां जगांतील सर्व विमानांतून ५३६२ इंजिनें बसविलेलीं आहेत त्यांपैकी ३३३० किंवा ६२ टक्के इंजिनें ब्रिटनमध्यें तयार झालेलीं आहेत.

**भोपाळ येथें इंजिनिअरिंग कॉलेज**—भोपाळ येथें एक प्रादेशिक इंजिनिअरिंग कॉलेज स्थापन करण्यांत येणार असल्याचें जाहीर झालें आहे. कॉलेजला आझाद कॉलेज ऑफ टेक्नॉलजी असें नांव देण्यांत येणार असून त्यासाठी लागणारा सर्व भांडवली स्वरूपाचा खर्च मध्यवर्ती सरकार करणार आहे. कॉलेजमध्यें १,२५० विद्यार्थ्यांची शिकण्याची सोय होईल.

**दक्षिण अमेरिकेला रशिआची मदत**—रशिआचे उपपंतप्रधान मि. मिकोयान हे सध्या उत्तर मेक्सिकोच्या दौऱ्यावर आहेत. दौऱ्यांत एका प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं, दक्षिण अमेरिकेंतील लोकांचें राहाणीचें मान सुधारण्यासाठी व तेथील उत्पादन वाढविण्यासाठी रशिआ कमी व्याजाच्या दरानें मुक्त हस्तानें मदत देण्यास तयार आहे.

**रतलाम येथें स्पिरिटचा कारखाना**—रतलाम येथें स्पिरिट तयार करण्याचा कारखाना स्थापन करण्याचें मध्यप्रदेश सरकारनें ठरविलें आहे. कारखाना दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा एक भाग असून त्यासाठी २१ लाख रु. खर्च येईल. दरसाल ३,००० गॅलन स्पिरिट कारखान्यांत तयार होईल.

**अमेरिका रशिआच्या मागें नाहीं**—शास्त्रीय व तांत्रिक प्रगतीचा साकल्यानें विचार करतां अमेरिका रशिआच्या मागें नाहीं, असें मत अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मि. हर्टर ह्यांनीं एका लेखांत व्यक्त केलें आहे. अग्निबाण व खंडांतर्गत प्रवास करूं शकणारीं शस्त्रास्त्रें ह्यांच्या बाबतींत मात्र रशिआ आज तरी अमेरिकेच्या थोडासा पुढें आहे, हें त्यांनीं मान्य केलें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २ डिसेंबर, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परदेशीय भांडवलाला पाकिस्तानचें उत्तेजन

पाकिस्तानांत परदेशीय भांडवल आकर्षित व्हावें म्हणून पाकिस्ताननें जोराचे प्रयत्न चालविले आहेत. पाकिस्तानच्या सरकारनें परदेशीय भांडवलदारांना असें निःसंदिग्ध आश्वासन दिले आहे कीं पाकिस्तानांत गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलावर सुटणारा नफा तर भांडवलाच्या मालकांना आपल्या देशांत पाठवितां येईलच, पण गुंतविलेलें भांडवलहि पाहिजे तेव्हां परत काढून घेतां येईल. पाकिस्तानांत भांडवल गुंतवून मिळविलेला नफा जर पुन्हां तेथेंच गुंतविण्यांत आला असल तर तो सुद्धां भांडवल म्हणून परत काढून घेतां येईल. '

पाकिस्तानची औद्योगिक प्रगति करण्यासाठी फार मोठें भांडवल लागेल ह्याची जाणीव प्रथमपासूनच ठेवण्यांत आली होती. ह्या प्रगतीसाठी देशांतील साधनसंपत्ति अपुरी पडेल म्हणून तिला परदेशीय मदतीची जोड देण्यांत आली पाहिजे ह्याचीहि कल्पना सरकारला होती. १९४८ सालीं पाकिस्तान सरकारनें उद्योगधंद्यांसंबंधींच्या आपल्या धोरणासंबंधीं ठराव केला होता. त्यांत असें म्हटलें होतें कीं, परदेशीय भांडवलाचें पाकिस्तान स्वागत करील. विशेषतः कांहीं मूलभूत स्वरूपाच्या धंद्यांत पाकिस्तानला परदेशीय भांडवल हवें आहे. मात्र ह्या धंद्यांतील ५१ टक्के भांडवल पाकिस्तानांतीलच असलें पाहिजे. मूलभूत उद्योगधंदे सोडून इतर उद्योगधंद्यांत पाकिस्तानांतील भांडवल निदान ३० टक्के तरी असलें पाहिजे. पाकिस्तानांत सध्यां जी राजवट अधिकारावर आहे तिनें मात्र परदेशीय भांडवलाच्या गुंतवणुकीवरील सर्व प्रकारचे निर्बंध पूर्णपणें काढून टाकले आहेत. त्याचप्रमाणें ज्या उद्योगधंद्यांत परदेशीय भांडवल गुंतलेलें असेल त्यांचें राष्ट्रीयीकरण करण्याचा सरकारचा हेतु नाहीं असेंहि जाहीर करण्यांत आलेलें आहे. ह्या संदर्भांत आणखी असें स्पष्ट करण्यांत आलें आहे कीं परदेशीय भांडवल गुंतलेल्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यासारखी आणीबाणीची परिस्थिति उत्पन्न झाल्यास भांडवलाच्या मालकांना योग्य व वाजवी नुकसानभरपाई देण्यांत येईल, आणि ती ज्या देशांतून भांडवल आलेलें असेल त्या देशाच्या चलनांत देण्यांत येईल.

करांच्या बाबतींत पाकिस्तानी नागरिक व परदेशीय नागरिक ह्यांच्यांत भेदभाव केला जात नाहीं. कराच्या आकारणीसाठी फक्त वास्तव्याची कसोटी मानण्यांत येते. पाकिस्तानला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतामधील कराच्या आकारणीच्या बाबतींत मुख्य कटाक्ष उत्पन्नावर देण्यांत येत असे. पण, पाकिस्तानची निर्मिती झाल्यानंतर सरकारचें उत्पन्न ही कसोटी प्रमुख मानण्यांत येईनाशी झाली. त्याऐवजीं करांतून माफी, कराविषयीं सवलती, इत्यादि उपाय भांडवलाच्या गुंतवणुकीला व संचयाला उत्तेजन मिळावें अशा रीतीनें वापरण्यांत येऊं लागले. गेल्या वर्षापर्यंत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उभारण्यांत आलेल्या नव्या उद्योगधंद्यांत मिळालेला नफा प्राप्तीवरील करापासून व कॉर्पोरेशन करापासून अंशतः मुक्त होता. ही सूट गुंतविलेल्या भांडवलाच्या ५ टक्क्यापर्यंतच लागू होती. त्याशिवाय बिझिनेस प्रॉफिटस् टॅक्सहि त्यांना पूर्णपणें माफ होता. घसारा काढण्याच्या बाबतींतहि खूप सवलती देण्यांत आल्या होत्या. त्या सवलतीमुळें नव्या उद्योगधंद्यांना पहिल्या तीन-चार वर्षांच्या अवधींतच आपलें बहुतेक भांडवल परत मिळविणें शक्य झालें. नव्या उद्योगधंद्यांना मिळणाऱ्या ह्या व इतर सवलती परदेशीय भांडवलालाहि लागू असल्यामुळें पाकिस्तानांत परदेशांतील खाजगी भांडवलदार आपलें भांडवल गुंतविण्यास खुषीनें तयार होतील असा अंदाज करण्यांत येत आहे.

---

## भारत-झेकोस्लोव्हाकिआ व्यापारी करार

भारत व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान एका व्यापारी करारावर सह्या करण्यांत आल्या आहेत. करारांतील शर्तीप्रमाणें झेकोस्लोव्हाकिआकडून भारताला २३ कोटी रुपयांचें दीर्घ मुदतीचें कर्ज मिळणार आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उभारावयाच्या तीन मोठ्या औद्योगिक विकास योजनांना झेकोस्लोव्हाकिआच्या मदतीचा फायदा होणार आहे. रांची येथें उभारण्यांत यावयाच्या ओतकामाच्या प्रचंड भट्टीसाठी लागणारी यंत्रसामुग्री झेकोस्लोव्हाकिआकडून मिळणार आहे. त्याशिवाय भारी यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या कारखान्याचें साहित्य आणि भारी विजेचीं यंत्रें तयार करणाऱ्या कारखान्याचें साहित्यहि मिळणार आहे. कर्जाची मुदत आठ वर्षांची असून त्यावर २॥ टक्के दरानें व्याज आकारण्यांत यावयाचें आहे. प्रत्येक कारखान्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीचा अखेरचा हप्ता भारताला मिळाल्यानंतर एका वर्षानें कर्जाचा पहिला हप्ता परतफेडीसाठी रुजू होणार आहे. तिन्ही कारखान्यांना मिळून साधारणपणें १८ कोटी रु. भांडवली खर्च येईल. ओतकामाच्या कारखान्यासाठी सुमारें ७ कोटी रु. लागतील, अवजड यंत्रसामुग्रीच्या कारखान्यासाठी सुमारें ३·५ कोटी रु. लागतील आणि भारी वजनाच्या विजेच्या यंत्रसामुग्रीच्या कारखान्यासाठी सुमारें ७·५ कोटी रु. लागतील. कर्जाची फेड वस्तूंच्या ऐनजिनसी बदलाच्या साह्यानें करण्यांत येणार आहे. कर्जाच्या परतफेडीसाठी झेकोस्लोव्हाकिआ भारताकडून बिडाचें लोखंड, रासायनिक व एंजिनिअरिंगचा माल, संस्कारित खनिजें व अर्धवट तयार झालेला कांहीं माल घेणार आहे.

---

## श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांची गुजराती लोकप्रियता

श्री. वा. काळे, संपादक 'अर्थ', ह्यांच्या 'कण आणि क्षण' ह्या पुस्तकाच्या गुजराती अनुवादाची (सुखी जीवननी पगदंडी) तिसरी आवृत्ति आणि 'पुढें पाऊल' ह्या पुस्तकाच्या गुजराती अनुवादाची (सदाचारने पगले) दुसरी आवृत्ति अहमदाबादच्या सस्तु साहित्य संस्थेतर्फे नोव्हेंबर १९५९ मध्यें प्रसिद्ध झाली आहे.

## परदेशीय प्रवासाच्या उत्पन्न-खर्चाचा हिशेब

भारताच्या परराष्ट्रीय देण्या-घेण्याच्या हिशेबांत प्रवासविषयक देण्या-घेण्याची अदृश्य बाब अधिकाधिक महत्त्व पावत आहे. परदेशी प्रवासावर १९५७ मध्यें बसविलेलीं बंधनें अजून अमलांत असल्याकारणानें १९५७ सालीं परदेशी प्रवासावर ६·८६ कोटी रुपये खर्च झाले होते त्यांत १९५८ मध्यें फक्त ०·४५ कोटी रुपयांची वाढ होऊन ती रक्कम ७·३१ कोटी रुपये झाली. प्रवासाच्या उत्पन्नांत हळूहळू वाढ होत आहे. १९५८ मध्यें तें उत्पन्न १७·४७ कोटी रु. भरलें.

उत्पन्न :—१९५८ मध्यें परदेशी प्रवासाचें उत्पन्न १·५० कोटी रुपयांनीं वाढलें; १९५७ मधील वाढ ०·५३ कोटी रुपयांची व १९५६ मधील वाढ ५·१४ कोटी रुपयांची होती. १९५७ चे मानानें १९५८ मध्यें ९·४% वाढ झाली, त्यांपैकी ६०% रक्कम डॉलर प्रदेशांनीं दिली. स्टर्लिंग प्रदेशाकडून मिळालेलें उत्पन्न फक्त ७ लक्ष रुपयांनीं वाढलें; डॉलर प्रदेशांकडून मिळालेलें उत्पन्न ३·६० कोटी रुपयांवरून ४·५३ कोटी रुपयांवर गेलें. स्टर्लिंग प्रदेशांकडून मिळणारें उत्पन्न १९५६–५८ ह्या मुदतींत सुमारें ९·९ कोटी रुपयांवर स्थिर असलें तरी एकूण उत्पन्नाच्या मानानें तें पुष्कळच मोठें आहे. पण, एकूण उत्पन्नाशीं त्याचें पडणारें प्रमाण १९५६ मध्यें ६४·२% होतें तें १९५८ मध्यें ५६·१% वर उतरलें.

**परदेश-प्रवासाचा खर्च**

( १९५६ ते १९५८—उद्देशानुसार, आंकडे कोटी रुपयांचे )

| उद्देश | १९५६ | १९५७ | १९५८ |
|---|---|---|---|
| १. चैन ... | ९·७६ | — | — |
| २. व्यवसाय ... | ०·४१ | ०·८७ | ०·९१ |
| ३. शिक्षण ... | १·५४ | ३·१० | ३·४९ |
| ४. प्रकृति ... | ०·१५ | ०·२३ | ०·१६ |
| ५. सरकारी काम ... | ०·१३ | ०·२४ | ०·१७ |
| ६. इतर ... | १·४० | २·४२ | २·५८ |
| एकूण... | १३·३९ | ६·८६ | ७·३१ |

परदेशी प्रवासाच्या उत्पन्नाचे आंकडे तपशिलांत जाऊन पाहिलें, तर असें दिसून येतें कीं, चैनीच्या सदरांत बसणाऱ्या प्रवाशांकडून मिळणारी रक्कम १९५७ मध्यें ८·४ कोटी रु. होती ती आतां १२·६ कोटी रु. झाली आहे. म्हणून, एकूण उत्पन्नांतलें तिचें प्रमाण ५२·५% चें ७२·४% झालें आहे. चैनीचे खालोखाल व्यवसायासाठी येणाऱ्या प्रवाशांपासून उत्पन्न मिळतें. १९५८मध्यें तें ३·०३ कोटी रु. मिळालें; एकूण उत्पन्नाच्या तें १७·३% भरलें.

खर्च :—१९५७ चे मानानें परदेशी प्रवासावर ४५ लक्ष रु. अधिक खर्च झालें, त्याचें मुख्य कारण परदेशी प्रवासास जाणारांची संख्या वाढली आणि परदेशांतील रहाणीचा खर्चहि वाढला. स्टर्लिंग व डॉलर प्रदेशांकडे जाणाऱ्या हिंदी प्रवाशांना जास्त हुंडणावळ उपलब्ध करून दिली गेली. स्टर्लिंग प्रदेशांकडे जाणाऱ्या हिंदी प्रवाशांनीं १९५७ मध्यें ३·८५ कोटी रु. खर्चले; १९५८ मध्यें त्यांनीं ४·०९ कोटी रुपये खर्चले. डॉलर प्रदेशांतील तत्सम आंकडे १·१८ कोटी रु. व १·३९ कोटी रु. असे आहेत. परदेशी प्रवाशांपैकी विद्यार्थ्यांनीं १९५७ चे मानानें १९५८ सालीं ३९ लक्ष जास्त रु. खर्च केले; प्रकृति आणि सरकारी काम ह्यासाठी खर्च प्रत्येकी सुमारें ७ लक्ष रुपयांनीं कमीच झाला.

वाढावा:—परदेशी प्रवासाच्या उत्पन्न-खर्चांत १९५८ मध्यें १०·१६ कोटी रुपयांचा वाढावा उरला; १९५७ मध्यें तो ९·११ कोटी रु. होता; १९५६ मध्यें तर तो फक्त २·०५ कोटी रु. होता. ह्या वाढाव्याला मुख्य हातभार स्टर्लिंग प्रदेशांतील लोक लावतात, हें खरें आहे. परंतु डॉलर प्रदेशाशीं देण्याघेण्यांत उरणारा वाढावा १९५७ मध्यें २·४२ कोटी रु. होता तो १९५८ मध्यें ३·१४ कोटी रु. झाला; स्टर्लिंग प्रदेशांशीं देण्याघेण्यांत उरणारा वाढावा १७ लक्ष रुपयांनीं आकसला.

**पेशावर जवळ प्राचीन बौद्धमठ**—पेशावर जवळील एका प्राचीन बौद्धमठाचा शोध एका जपानी पुराणवस्तु शास्त्रज्ञानें लावला आहे. उत्खननाची जागा १,००० फूट लांब व ६०० फूट रुंद आहे. उत्खनन १६ फुटांपर्यंत झालें असतांना मठाचा शोध लागला. मठाच्या भिंतींवर उत्कृष्ट प्रकारचीं चित्रें आढळून आलीं आहेत.

**भारताच्या परदेश-प्रवासाचा प्रदेशवार जमाखर्च**

( आंकडे कोटी रुपयांचे, कंसांतील आंकडे एकूणशीं % दर्शवितात )

| | १९५६ | | | १९५७ | | | १९५८ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जमा | खर्च | बाकी | जमा | खर्च | बाकी | जमा | खर्च | बाकी |
| १. स्टर्लिंग प्रदेश ... | ९·९२ (६४·२५) | ६·८१ (५०·८५) | +३·११ | ९·८० (६१·३७) | ३·८५ (५६·१२) | +५·९५ | ९·८७ (५६·५०) | ४·०९ (५५·९५) | +५·७८ |
| २. डॉलर प्रदेश ... | ३·८९ (२५·२०) | १·१२ (८·३७) | +२·७७ | ३·६० (२२·५४) | १·१८ (१७·२०) | +२·४२ | ४·५३ (२५·९३) | १·३९ (१९·०२) | +३·१४ |
| ३. ओ. ई. ई. सी. प्रदेश ... | ०·९३ (६·०२) | ४·३४ (३२·४१) | −३·४१ | १·४१ (८·८३) | १·४८ (२१·५८) | −०·०७ | १·४७ (८·४१) | १·५० (२०·५२) | −०·०३ |
| ४. इतर बिगर-स्टर्लिंग प्रदेश | ०·७० (४·५३) | १·१२ (८·३७) | −०·४२ | १·१६ (७·२६) | ०·३५ (५·१०) | +०·८१ | १·६० (९·१६) | ०·३३ (४·५१) | +१·२७ |
| एकूण... | १५·४४ | १३·३९ | +२·०५ | १५·९७ | ६·८६ | +९·११ | १७·४७ | ७·३१ | +१०·१६ |

## खोटी एंडॉर्समेंट असलेला ड्राफ्ट वसूल करण्यांत 'कन्व्हर्शन' घडलें

### खऱ्या मालकाची भरपाई करण्याची बँकेवर जबाबदारी

२१ मे, १९५६ रोजीं मेसर्स हिरेमणी अँड जगलुरे अँड कं., ह्या हुबळी येथील फर्मनें कॅनरा इंडस्ट्रिअल अँड बँकिंग सिंडिकेट लि., हुबळी, कडून बँकेच्या मुंबई शाखेवर, के. उमाकांत ह्या नांवें काढलेला ८,००० रुपयांचा डिमांड ड्राफ्ट विकत घेतला. हा ड्राफ्ट टपालानें धाडपर्यंत आला, पण तो वाटेंत चोरला गेला.

२३ मे, १९५६ रोजीं शेठ छबिलदास जगजीवनदास ह्यानें न्यू सिटिझन बँक लि., मुंबईत करंट अकाउंट उघडला. त्याच दिवशीं छबिलदासला. ह्या नव्या खातेदाराची ओळख देणाऱ्या "एम्. बी. कुलकर्णी" ची सही तपासून न पाहतां (जी पुढें बनावट असल्याचें आढळलें) चेकबुक देण्यांत आलें.

### खोट्या नांवानें खातें

२४ मे, १९५६ हा सुट्टीचा दिवस होता. २५ मे रोजीं अबु इस्माइल मर्चंट ह्यानें वरील न्यू सिटिझन बँकेंत जोशी कमलाकांत उमाकांत ह्या खोट्या नांवानें ५०० रु. भरून करंट अकाउंट उघडला.

शेठ छबिलदासनें, २३ मे रोजीं अकाउंट उघडल्यावर, अबु इस्माइल मर्चंटला २४ मे ह्या तारखेचा ५०० रुपयांचा चेक दिला, तो मर्चंटनें २५ मे रोजीं वटवला आणि त्याच पैशांनीं त्यानें करंट अकाउंट उघडला, असें दिसून आलें.

दोन दिवसांपूर्वीच बँकेचा खातेदार बनलेल्या शेठ छबिलदासनें अबु इस्माइल मर्चंटच्या अर्जावर ओळख घातली होती. त्याच दिवशीं, २५ तारखेस, मर्चंटनें ८,००० रुपयांच्या ड्राफ्टवर खोटी सही करून तो आपल्या खात्यांत भरला. बँकेनें ह्या ड्राफ्टची कॅनरा इं. अँड बँकिंग सिंडिकेटकडून वसुली केली व ती रक्कम त्याच्या खातीं जमा केली.

२८ मे रोजीं मर्चंटनें आपल्या खात्यांतून ७,९०० रुपये काढून घेतले.

कालांतरानें ड्राफ्टचा पत्ता लागला आणि ड्राफ्ट विकत घेणारी फर्म आणि ज्याच्या नांवानें ड्राफ्ट काढला होता तो के. उमाकांत, ह्यांनीं बँकेवर प्रस्तुत दावा लावून ड्राफ्टची रक्कम मिळण्याची मागणी केली.

ड्राफ्टची रक्कम वसूल करण्यांत बँकेनें निष्काळजीपणा केला काय, हा प्रश्न उपस्थित झाला. ड्राफ्टबाबत कांहीं शंकास्पद होतें काय, त्याविषयीं खबरदारीची सूचना बँकेस मिळाली होती काय, हे प्रश्न येथें महत्त्वाचे ठरतात. ड्राफ्टमुळेंच केवळ शंका निर्माण होण्याजोगी नव्हती, एवढा बचाव बँकेस पुरणार नाहीं. त्या पूर्वीच्या किंवा चालू घटना शंकास्पद असतील, तर ड्राफ्टची रक्कम वसूल करण्यापूर्वी जरूर त्या चौकशा करणें बँकेचें कर्तव्य ठरतें.

### बँकेचा निष्काळजीपणा

सर्व परिस्थितीचा व गोष्टींचा विचार करतां, बॉबे सिटी सिव्हिल कोर्टाचे जज्ज, श्री. जी. ए. ठक्कर, ह्यांची खात्री पटली कीं, छबिलदासचें खातें उघडण्यांत बँक निष्काळजी होती; त्यानंतर अबु इस्माइल मर्चंटचें खातें उघडण्यांतहि बँकेनें निष्काळजीपणा केला. दुसरें खातें उघडण्याच्या परिस्थितींत शंकास्थानें होतीं, तरी सुद्धां मर्चंटच्या अप्रामाणिकपणाविषयीं कांहींहि चौकशी करण्यांत आली नाहीं. त्यानें ज्याप्रकारें खातें चालवलें, त्या प्रकारानें बँकेस शंका वाटायला हवी होती. २६ मे, १९५६ रोजीं त्याला ७,९०० रु. खात्यांतून काढून घेऊं देण्याचे कामीं बँकेनें हयगय केली आहे. म्हणून 'कनव्हेशन' साठी बँक जबाबदार आहे; तिच्या निष्काळजीपणामुळें तिला निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टाच्या १३१ व्या कलमाचें संरक्षण मिळणार नाहीं. जज्जानें वादीला ८,३०० रुपये ठेवविलें.

### 'कन्व्हर्शन' चा अर्थ

ज्याच्यासाठी बँक चेक वगैरे बिलांची वसुली करते, त्याखेरीज इतरांचेहि बाबतींतहि बँकेवर देणें देण्याची जबाबदारी येऊं शकते. दुसऱ्याच्या मालमत्तेंत अधिकार नसतांना केलेला हस्तक्षेप म्हणजे कन्व्हर्शन. मूळ मालकाच्या अधिकाराला बाध येईल अशा रीतीनें त्याच्या मालमत्तेचा वापर करणें, नाश करणें, हीं कन्व्हर्शनच्या सदरांत येतात. मालमत्तेमध्यें बिलें, चेक्स व प्रॉमिसरी नोटा ह्यांचाहि समावेश होतो. बँकेनें दुसऱ्याच्या मालमत्तेचा असा बेकायदा वापर केला असला, तर खऱ्या मालकाची भरपाई करण्याची जबाबदारी बँकेवर येऊन पडते. मूळ मालक, ज्यानें कन्व्हर्शन केलें असेल, त्याचेवर दावा लावून मूळ मालमत्ता व नुकसानभरपाई आणि दाव्याचा खर्च मिळवूं शकतो. चेक, वगैरेंच्या बाबतींत त्यावर लिहिलेली रक्कम हीच त्याची भरपाईची रक्कम समजली जाते.

---

**राजस्थानची औद्योगिक प्रगति**—राजस्थानचा शेती च्या दृष्टीनें विकास करण्यासाठी कालव्यांची योजना झाली आहे. पण राज्याच्या औद्योगिक प्रगतीसाठीं वीज निर्मिति केंद्राची फार आवश्यकता आहे असे उद्गार राजस्थान चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष श्री. शांति प्रसाद जैन ह्यांनीं काढले आहेत. राजस्थानांत कोळशाच्या साह्यानेंच वीज निर्माण करावी लागेल.

**अधिक मदत देण्याची तयारी**—भारताचे अन्नमंत्रि श्री. स. का. पाटील नुकतेंच परदेशाचा दौरा करून परत आले. आपल्या युरोपमधील दौऱ्याचा अनुभव सांगतांना ते म्हणाले कीं पश्चिम जर्मनीच्या सरकारनें भारताच्या विकासाच्या योजनांना अधिक मदत देण्याची तयारी दर्शविली आहे. पश्चिम युरोपमधील इतर कांहीं देशहि भारताला शक्य ती मदत करण्यास तयार असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

**गुजरातच्या राजधानीचें नांव**—नव्यानें निर्माण करण्यांत येणाऱ्या गुजरात राज्याची राजधानी अहमदाबाद शहराजवळ बसविण्यांत येण्याचा संभव आहे. राजधानी पुढील सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत तयार होण्याची शक्यता आहे. सरदार वल्लभभाई पटेल ह्यांचें स्मारक म्हणून राजधानीचें नांव वल्लभनगर ठेवण्यांत यावें, अशा सूचना करण्यांत येत आहेत.

**ब्रिटिश कंपनीला काम**—पाकिस्ताननें सक्करजवळ एक पूल बांधण्याचें काम एका ब्रिटिश कंपनीकडे सोपविलें आहे. हा पूल रेल्वेचा व रस्त्याचा असा होईल. पूल बांधण्यासाठी १५४ लाख रुपये खर्च येणार आहे. सध्यांच्या 'लॅन्सडाऊन' पुलाऐवजीं तो बांधण्यांत येत असून त्यासाठीं ३,३०० टन पोलाद लागणार आहे.

### १२ कायदेशीर निधींची स्थापना

निरनिराळ्या १२ कायदेशीर निधींची स्थापना करून ते चालविण्याविषयींचें व यासंबंधीच्या इतर बाबींसंबंधींचें एक बिल मुंबई सरकारच्या २३ नोव्हेंबरच्या गॅझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

या बिलान्वयें निर्माण करण्यांत येणारे निरनिराळे १२ निधि पुढीलप्रमाणें आहेत. पाणीपुरवठा निधि (३ कोटी रु.), आपद्ग्रस्त मदतनिधि (५० लाख रु.), सुखसोयींविषयक निधि (५० लाख रु.), शैक्षणिक इमारतनिधि (२ कोटी रु.) स्त्री नोकरांसंबंधींचा इमारतनिधि (१ कोटी रु.) इमारतींसाठी लागणाऱ्या जमिनींचा विकासविषयक निधि (घर बांधकामनिधि) (२ कोटी रु.), अविकसित भागाचा विकासविषयक निधि (१·५० कोटी रु.), मासेमारी विकास निधि (५० लाख रु.); सहकारी संस्थांस मदत देण्यासंबंधींचा निधि (१ कोटी रु.); वैद्यकीय संशोधन संबंधींचा निधि (१ कोटी रु.) शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधनविषयक निधि (१ कोटी रु.), आणि शेतकी संशोधनविषयक निधि (१ कोटी रु.)

राज्यांतील विकासविषयक कार्यक्रमांची गति वाढविण्याच्या दृष्टीनें, कांहीं विशिष्ट कार्यक्रमावर खर्च करण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधींतून कांहीं खास निधि उभारावेत असा विचार होता. या निधींतील खर्च न झालेल्या रकमा सरकारजमा होणार नव्हत्या. याप्रमाणें फेब्रुवारी १९५९ मध्यें मुंबई विधानसभेंत १४ कोटी रुपयांची पुरवणीमागणी करण्यांत आली. त्यानंतर विधानसभेच्या गेल्या अधिवेशनांत आणखी १ कोटी रुपयांची मागणी करण्यांत आली.

मुंबई विधानसभेंत पहिल्या १४ कोटी रुपयांच्या मागणीवर चर्चा चालू असतां, अशा प्रकारें निर्माण केलेल्या निधींतून खर्च होणाऱ्या निधींस कायदेशीर मान्यता द्यावी कीं नाहीं, असा प्रश्न उपस्थित करण्यांत आला. तेव्हां यासंबंधी कायदेशीर निधि निर्माण करून त्यासंबंधींच्या इतर विषयासंबंधी कायद्यानें तरतुदी करणें जरूर आहे असें वाटलें. म्हणून या निधींची स्थापना करण्यासंबंधी वरील बिलांत तरतूद करण्यांत आली आहे.

**पगाराचीं पुडकीं विमानानें टाकणार**—युगांडामधील कांहीं भागांत लुटारूंचा उपद्रव वाढल्यामुळें दूरदूरच्या मळ्यांतील व कारखान्यांतील कामगारांचा पगार खुष्कीच्या मार्गानें पाठविणें घोक्याचें झालें आहे. ही अडचण दूर करण्यासाठी विमानांतून पगाराचीं पुडकीं टाकण्याचा विचार चालू आहे. पोलिसांच्या नजरेखालीं खुणेच्या जागीं पुडकीं टाकण्यांत येतील.

**भूतानमधील रस्त्यांसाठी मदत**—भूतानमधील कांहीं रस्ते बांधण्यासाठी भारत-सरकारनें जास्तींत जास्त १५ कोटी रुपयांची रक्कम देण्याचें ठरविलें आहे. रकमांची गरज जसजशी लागेल तसतशी ती देण्यांत येईल. भूतानच्या आर्थिक विकासासाठी दरसाल ७ लाख रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत येणार आहे. पुढील वर्षापासून ही रक्कम भूतानला मिळूं लागेल.

**नवऱ्यांना बायकांकडून पोटगी**—नवरा म्हातारपणामुळें, आजारीपणामुळें अगर मानसिक व शारीरिक दुर्बलतेमुळें काम करण्यास असमर्थ असला तर त्याला बायकोकडून पोटगी देण्याची व्यवस्था करणारें एक बिल ब्रिटिश सरकारतर्फे पार्लमेंटमध्यें मांडण्यांत आलें आहे. नवरा-बायकोत बेबनाव असेल तर वरील कारणांखाली बायकांना पोटगी द्यावी लागण्याचा संभव आहे.

**वाईट मार्गाला लागलेलीं मुलें**—गुन्हेगार प्रवृत्तीला लागलेल्या मुलांच्या प्रश्नाचा तातडीनें अभ्यास करण्यांत यावा असा ठराव संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आम सभेनें केला आहे. ह्या सामाजिक घटनेचा अभ्यास आंतरराष्ट्रीय पातळीवरून करण्यांत यावा, असें ठरावांत सुचविण्यांत आलें आहे. प्रश्नाचें स्वरूप गंभीर असल्याचें ठरावांत नमूद करण्यांत आलें आहे.

**रशिआ-अमेरिका करार**—शास्त्रे, तंत्रविद्या, शिक्षण आणि संस्कृति ह्या क्षेत्रांत एकमेकांशीं सहकार्य करण्याचा करार रशिआ आणि अमेरिका ह्या देशांनीं केला आहे. कराराची मुदत दोन वर्षांची आहे. संबंधित क्षेत्रांतील तज्ज्ञांचीं प्रतिनिधि मंडळें परस्परांच्या देशांचा दौरा करतील व अभ्यास करतील.

**शैक्षणिक चित्रपट**—अमेरिकेंतील एका शैक्षणिक बोलपट तयार करणाऱ्या कंपनीनें आपल्या कांहीं बोलपटांच्या प्रती भारतांत तयार करून घेण्याचें ठरविलें आहे. परदेशीय चलनाच्या टंचाईमुळें असे चित्रपट परदेशांतून आणणें अवघड होत चाललें होतें. कांहीं बोलपटांना भारतामधील भाषांमधून बोलणारी आवाज-पट्टीहि जोडण्यांत येणार आहे.

**बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना**—बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना केरळमध्यें कोचीन येथें स्थापन करण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. केरळ सरकारनें खास हुकूम काढून ७३ एकर जमीन आपल्या ताब्यांत घेण्यासाठी त्यांच्या मालकांना कळविलें आहे. बोटी बांधण्याचा भारतामधील पहिला कारखाना विजगापट्टम येथें काढण्यांत आलेला आहे.

**पोलाद कंपन्यांविरुद्ध दावा**—अमेरिकेच्या न्यायखात्यातर्फे १९ पोलाद कंपन्यांवर दावा लावण्यांत आला आहे. ह्या कंपन्यांनीं बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या पोलादाच्या सामानाच्या बाबतींत, बाजारांतील स्पर्धा थांबवून मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असें खात्याचें म्हणणें आहे. १९ कंपन्यांत अमेरिकेंतील दोन सर्वांत बड्या कंपन्या आहेत.

**भारतीय बोलपटाला बक्षीस**—सॅन्फ्रॅन्सिस्को येथें भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत भारतामधील 'राधाकृष्ण' ह्या बोलपटाला कलाविषयक चित्रपटांतील पहिल्या प्रतीचा चित्रपट म्हणून बक्षीस मिळालें. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव भरविण्याच्या बाबतींत मान्यता मिळालेली अमेरिकेंतील ही एकमेव संस्था आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# विदेश-यात्रेची पूर्वतयारी

## आर्थिक व राजकीय मंजुऱ्या आणि परवाने

[ श्री. महेन्द्र राजा, एम्. ए. (लंडन) ]

विदेश-यात्रा म्हणजे भारत देशाच्या बाहेरील प्रवास; मग तो पायीं, समुद्रमार्गानें, विमानानें वा स्वतःच्या मोटारींतून यांपैकी कोणत्याहि पद्धतीनें करावयाचा असो. वास्तविक ब्रह्मदेश, पाकिस्तान आणि सिलोन हे एकेकाळचे भारताचेच भाग; पण त्यांचीसुद्धां आज विदेशांत गणना होते; एवढेंच नव्हे तर भारताच्या सीमेला लागून असलेल्या नेपाळसारख्या देशांचाहि विदेशांतच अंतर्भाव होतो. भारताच्या सीमा ओलांडून कोठेंहि व कोणत्याहि मार्गानें जावयाचें म्हटलें कीं त्याकरितां कांहीं आवश्यक "फॉरमॅलिटिझ्" (औपचारिक अटी) पूर्ण कराव्याच लागतात; त्याशिवाय कोणालाहि भारताच्या पलीकडे एक पाऊलसुद्धां टाकतां यावयाचें नाहीं. सामान्य माणसाच्या दृष्टीनें मुबलक पैसा ही विदेश-यात्रेकरितां सर्वांत महत्त्वाची बाब असली तरी तीवांचून विदेश-यात्रा फलद्रूप होऊंच शकत नसल्यामुळें विदेशयात्रेचा विचारहि गृहित धरूनच करावयाचा असतो. तेव्हां विदेशयात्रेकरितां पुरेसा पैसा जवळ असतांनासुद्धां ज्या विशिष्ट अटी पूर्ण केल्याशिवाय त्या बाबतींत पाऊल पुढें टाकतां येत नाहीं त्यांचाच या ठिकाणीं विचार केलेला आहे. यावरून हें सहज ध्यानांत येईल कीं विदेशयात्रा म्हणजे मोटार किंवा गाडीचा प्रवास नव्हे, कीं तिकिट काढलें आणि केला प्रवास सुरू!

### पासपोर्ट व त्यासोबत द्यावयाचीं सर्टिफिकिटें

मनांतच नव्हे तर स्वप्नांत जरी विदेश-यात्रेचे विचार डोकावत असतील तर सर्वप्रथम तावडतोब पासपोर्ट मिळविण्याकरितां अर्ज करावयाला पाहिजे. "पासपोर्ट" ह्या एकमेव सर्टिफिकेटाच्या अभावीं प्रवासाची केलेली इतर सर्व व्यवस्था वा पैसा व्यर्थ होत. पांच वर्षांनंतर जरी परदेशांत जावयाचें असलें तरी पासपोर्ट-साठी त्वरितच अर्ज करणें शहाणपणाचें होईल.

पासपोर्ट हें एक आपल्या सरकारकडून विदेश-यात्रेच्छूंना मिळणारें प्रमाणपत्र असून त्यांत प्रमाणित केलेल्या प्रवाशाचें छायाचित्र, स्वाक्षरी, पूर्ण नांव व पत्ता, वय, शारीरिक वैशिष्ट्य इ. चा उल्लेख केलेला असतो. पासपोर्टलाच कांहीं जादा पृष्ठेंहि जोडलेलीं असतात; यावर एखाद्या देशाच्या सीमेंत प्रवेश करण्याकरितां त्या देशाच्या सरकारची परवानगी म्हणजेच "विसा" घ्यावा लागतो. सामान्य माणसांकरितां तरी पासपोर्ट मिळविण्याचें काम वाटतें तेवढें सोपें नाहीं.

**बँक मॅनेजरचें सर्टिफिकेट—** पासपोर्टच्या निर्धारित अर्जाच्या प्रती प्रत्येक राज्याच्या रिजनल पासपोर्ट ऑफिसर किंवा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कार्यालयांतून मिळूं शकतात. पासपोर्ट-फॉर्मच्या दोन प्रती मिळविण्याकरितां १० रु. फी भरावी लागते. अर्जाच्या ह्या दोन्ही प्रती भराव्या लागतात ही फी कोणत्याहि परिस्थितींत परत मिळत नाहीं. पासपोर्ट-फॉर्म सोबत जीं कांहीं आवश्यक सर्टिफिकिटें द्यावीं लागतात, त्यांत आपल्या बँक मॅनेजरकडून घ्यावयाचें सर्टिफिकेट सर्वांत महत्त्वाचें असतें. या सर्टिफिकेटावरील तारखेला त्या आपल्या खात्यांत असलेल्या शिल्लक रकमेचा तपशील दिलेला असावा.

**गॅरन्टी-फॉर्मः—** या सर्टिफिकेटांव्यतिरिक्त एक गॅरंटी फॉर्महि (जमानत-फॉर्म) घ्यावा लागतो. या फॉर्ममध्यें नमूद केलेल्या गोष्टींचा सारांश एवढाच कीं, गॅरंटी घेणारी व्यक्ति आपण परदेशांत वास्तव्य करीत असेपर्यंत आपली पूर्ण जबाबदारी घेते. परदेशांत भारत सरकारला आपल्याकरितां कांहीं करावें लागल्यास (जसे मृत्यूनंतरची उत्तरक्रिया, आपण तेथें केलेलें अशिष्ट वर्तन किंवा इतर कांहीं गडबड करून तद्देशीय सरकारच्या दृष्टीनें केलेला कायदेभंग इ. स्वरूपांच्या कारणांकरितां) भारत सरकारचे प्रतिनिधि आपणाला तेथें जी मदत करतील किंवा त्यांना त्याकरितां जो खर्च करावा लागेल त्या सर्वांची भरपाई वा परतफेड करण्याची जबाबदारी जमानतदारांवर असते. विदेशांत आपली शिल्लक संपुष्टांत आल्यास वा आपली आर्थिक स्थिति हलाखीची झाल्यास भारत सरकारचे प्रतिनिधि आपणाला स्वदेशीं परत पाठविण्याची व्यवस्था करतील व त्याबद्दलचा खर्चहि जमानतदाराला सोसावा लागतो. या गॅरंटी-फॉर्मवर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या समक्ष सही करावी लागते व त्यानंतर डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट त्यावर आपली स्वाक्षरी करून आपली सही त्याच्या समक्ष झाल्याचें प्रमाणित करतो. वाटेल ती व्यक्ति गॅरंटी-फॉर्मवर सही करूं शकणार नाहीं, त्याकरितांसुद्धां कांहीं ठराविक अटी आहेत. खालील तीन प्रकारचे लोक गॅरंटी-फॉर्म भरूं शकतात—

(१) स्वतःचें पक्कें घर असलेली (त्या घराबद्दल कोणत्याहि प्रकारचा झगडा किंवा कोर्टाकडून कारवाई चाललेली नसावी) व्यक्ति.

(२) स्वतःच्या नांवावर एखाद्या बँकेंत भक्कम पैसा (आपल्या पैशाव्यतिरिक्त) शिल्लक ठेवणारी व्यक्ति (कमींत कमी ४-५ हजार रु.)

(३) निश्चित वा बांधलेली मासिक प्राप्ति असणारी व्यक्ति (कमींत कमी २५०-३०० रु. दरमहा)

गॅरंटी घेणारी व्यक्ति वर सांगितलेल्यांपैकी पहिल्या वर्गांत मोडत असल्यास तिला आपल्या शहरांतील नगरपालिकेकडून एक सर्टिफिकेट मिळवावें लागेल. या सर्टिफिकेटांत त्या घराबद्दलची पूर्ण माहिती असावी. गॅरंटी घेणारी व्यक्ति दुसऱ्या वर्गांत मोडणारी असल्यास तिला आपल्या बँकेचें सर्टिफिकेट सादर करावें लागेल आणि तिसऱ्या वर्गांतील व्यक्तीला आपल्या कार्यालयाच्या सर्वोच्च अधिकाऱ्याकडून किंवा मालकांकडून एक प्रमाणपत्र मिळवून तें गॅरंटी-फॉर्मला जोडावें लागेल. या प्रमाणपत्रांत ती व्यक्ति त्या कार्यालयांत काम करीत असून तिचा पगार किती आहे हें प्रमाणित केलेलें असावें.

वरील सर्टिफिकेटांपैकी कोणत्याहि एका सर्टिफिकेटाची मूळ प्रत गॅरंटी-फॉर्मबरोबर जोडलेली असावी; तरच तो गॅरंटी-फॉर्म मान्य केला जाईल.

**ट्रस्टच्या वतीनें अधिकृत स्वीकृति—**उच्च शिक्षणाकरितां विदेशांत जावयाचें असल्यास आणि त्याकरितां आपणाला सरकार वा एखाद्या ट्रस्टकडून छात्रवृत्ति मिळाली असल्यासहि गॅरंटी-फॉर्म भरावा लागेलच; एवढेंच कीं त्यावर आपणाला शिष्यवृत्ति देणाऱ्या ट्रस्टच्या वतीनें स्वाक्षरी केलेली हवी. आपणाला कोणतीहि छात्रवृत्ति मिळालेली असो, आपल्याजवळ स्वतःचा थोडाफार तरी पैसा बँकेंत शिल्लक असावाच लागतो, (कमींत कमी तो परतीच्या प्रवासाला पुरेसा असावा) या रकमेबद्दल बँकेकडून एक सर्टिफिकेट घेऊन तें आपल्या अर्जासोबत पाठवावें लागेल.

**प्रिन्सिपालचें स्वीकृतिपत्र—**अर्जांतील एका रकान्याप्रमाणें (आपण विद्यार्थीरूपानें प्रवास करीत असल्यास) त्या ट्रस्टच्या

पत्राची एक प्रमाणित प्रतिलिपीहि पाठवावी लागेल. तीत आपणाला छात्रवृत्ति किंवा आर्थिक साहाय्य दिल्याची स्वीकृति दिलेली असावी. याशिवाय उच्च शिक्षणाकरितां आपण ज्या देशांत जात असाल तेथील शाळा-कॉलेज किंवा युनिव्हर्सिटीच्या प्रिन्सिपालच्या स्वीकृति-पत्राची प्रतिलिपीहि अर्जासोबत पाठवावी लागेल. आपण हें स्वीकृति-पत्र जर सोबत पाठविलें नाहीं तर आपल्या अर्जाचा साधारणपणें तोंपर्यंत कांहींच विचार केला जाणार नाहीं. तेथील कॉलेजकडून मिळविलेला प्रवेश-परवाना, तत्संबंधीची सूचना वा तशा अर्थाच्या पत्राची नक्कल पासपोर्ट ऑफिसकडे पाठवावयालाच पाहिजे.

वरीलपैकी एखादी किंवा सर्वच गोष्टी अर्जासोबत पाठविण्यास विसरलांत तर पासपोर्ट मिळविण्यास विनाकारण उशीर लागेल. याचा अर्थ असा मात्र नव्हे कीं, अर्जाबरोबर वरील सर्व प्रमाण-पत्रें पाठविलीं कीं आपणाला लगेच पासपोर्ट मिळेल. पासपोर्ट ऑफिसरची आपल्या विदेशयात्रेच्या हेतूबद्दलची खातरजमा होण्यावरच एकंदरींत हें सर्व अवलंबून असतें.

### छायाचित्राच्या तीन प्रती

उपरीनिर्दिष्ट तीन फॉर्मसव्यतिरिक्त आपल्या नवीनच काढलेल्या छायाचित्राच्या तीन प्रतींहि प्रमाणित करून अर्जासोबत पाठवावयाच्या असतात. छाया-चित्रांच्या ह्या प्रती कोणत्याहि गॅझेटेड ऑफिसरकडून प्रमाणित करून घेतां येतात. ह्या प्रती प्रमाणित करणाऱ्या ऑफिसरची स्वाक्षरी चित्राच्या भागावर नसावी; ती पृष्ठभागावरच असावी. एवढी काळजी न घेतल्यास पुन्हा दुसरें छायाचित्र पाठविण्याचा आपणाला आदेश येईल.

### स्वतःची स्वाक्षरी

अर्जाच्या शेवटच्या रकान्यांत दोन ठिकाणीं आपणाला आपली स्वाक्षरी करावी लागेल. ही स्वाक्षरी अगदीं नेहमींच्या ठराविक पद्धतीचीच असावी. या दोन स्वाक्षऱ्यांपैकी एक आपल्या पासपोर्टवर चिकटविली जाईल. आपल्या गन्तव्य स्थाना पोहोंचल्यानंतर वा बोटींत जरून पडल्यास, अगदीं अशीच स्वाक्षरी करावी लागेल.

याप्रकारें फॉर्म पूर्ण भरून झाल्यानंतर तो तिन्हीं प्रमाण-पत्रें व छायाचित्र यांसहित डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे पाठवावा, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट आपल्या शहरीं नसल्यास हें सर्व रजिस्टर्ड पोस्टानें जिल्ह्याच्या ठिकाणीं पाठवावें. रिजनल पासपोर्ट ऑफिसरकडेहि हें पाठवितां येतें; परंतु पुन्हां तें त्यांच्याकडून आवश्यक तपासणीकरितां डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडेच पाठविण्यांत येतें व यांत विनाकारण वेळ जातो. तेव्हां आपण सरळच तें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटच्या कार्यालयाकडे पाठविलेलें बरें.

(अपूर्ण)

कच्छमधील पाणीपुरवठा—मुंबई सरकारनें कच्छमधील निरोणा धरणाच्या योजनेला मंजुरी दिली आहे. हें धरण कच्छमधील दुसऱ्या क्रमांकाचें धरण आहे. धरणाच्या कामासाठी ५३ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. धरणाचें काम बहुधा दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत पुरें होईल.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. रू. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

एस्. ए. कुलकर्णी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.